21 FEB 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केंद्रीय निधीचा विकासासाठी उपयोग

## कुलगुरू; पंतप्रधानांकडून विद्यापीठे सक्षमीकरण योजनेंतर्गत निधी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठास दिलेला २० कोटी रुपयांच्या निधीचा उपयोग सुविधांची निर्मिती व सर्वांगीण विकासासाठी करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जम्मू आणि काश्मीर येथून केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानातंर्गत ७८ योजनांसाठी ३६०० कोटींहून अधिक निधीची घोषणा करण्यात आली. त्यानिमित्ताने राजर्षी शाहू सभागृहात उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने यापूर्वी शिवाजी विद्यापीठास भरीव निधी दिला आहे. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत विद्यापीठे सक्षमीकरण योजनेसाठी ५८ मध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे, ही अभिमानाची बाब आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानाची माहिती दिली. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. बी.एम. हिर्डेकर, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, डॉ. जी.बी. कोळेकर, डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले.

### आधुनिक शिक्षणासाठी प्रेरक काळ : पंतप्रधान मोदी

जम्मू येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील विद्यापीठे व शिक्षण संस्थांच्या घटकांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. ते म्हणाले, नवा भारत आजच्या युवा पिढीला आधुनिक शिक्षण घेण्यास प्रेरित करणारा आहे. युवा पिढीसाठी आयआयटी, आयआयएम, आयआयआयटी, एम्स, एनआयटी अशा संस्थांची उभारणी करण्यात येत आहे. यावेळी जम्मूचे उपराज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग, खा. जुगल किशोर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 FEB 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रीय निधीचा विनियोग : कुलगुरू

## पंतप्रधानांकडून 'विद्यापीठे सक्षमीकरण'मधून निधीची घोषणा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : 'केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानाअंतर्गत शिवाजी विद्यापीठास २० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला आहे. या निधीचा विनियोग विहीत सुविधांची निर्मिती व सर्वांगीण विकासासाठी उत्तम पद्धतीने करण्यात येईल,' अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे दिली.



कोल्हापूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू येथून विद्यापीठे सक्षमीकरण निधीची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घोषणा केली. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू येथून केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत विविध राज्यांतील विद्यापीठे आणि शिक्षण संस्थांना ७८ योजनांसाठी ३६०० कोटींहून अधिक निधीची घोषणा केली. त्यामध्ये विद्यापीठे सक्षमीकरण निधी योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठास २० कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे शिवाजी विद्यापीठ सहभागी झाले. त्यानिमित्ताने राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमात कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत विद्यापीठे सक्षमीकरण योजनेसाठी हजारहून अधिक विद्यापीठांचे प्रस्ताव दाखल झाले असताना त्यातील अवघ्या ५८ विद्यापीठांची निवड करण्यात आली, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे. ही आपणा सर्वांसाठीच अभिमानाची बाब आहे.'

यावेळी डॉ. महादेव देशमुख, श्रीकृष्ण महाजन, सरिता ठकार, जी. बी. कोळेकर, सागर डेळेकर, अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, बी. एम. हिर्डेकर, आर.बी. पाटील उपस्थित होते. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### पंतप्रधानांनी साधला संवाद

या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. 'हा नवा भारत आजच्या युवा पिढीला आधुनिक शिक्षण घेण्यास प्रेरित करणारा आहे. या पिढीसाठीच आयआयटी, आयआयएम, आयआयआयटी, एम्स, एनआयटी अशा आधुनिक शिक्षण संस्थांची उभारणी देशभरात करण्यात येत आहे. या सर्व बाबींचा युवा पिढीने लाभ घ्यायला हवा', असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जम्मूचे उपराज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग, खासदार जुगल किशोर, गुलाब अली आदी मान्यवर उपस्थित होते.

21 FEB 2024

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केंद्रीय निधीतून विद्यापीठाच्या विकासाला चालना

प्रतिनिधी
कोल्हापूर

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्यावतीने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान अर्थात पीएम-उषा योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठास २० कोटी रूपयांचा निधी जाहीर झाला आहे. या निधीतून विहीत सुविधांसह विद्यापीठाच्या विकासासाठी चालना मिळणार आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जम्मू येथून प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियाना अंतर्गत राज्यांतील विद्यापीठे आणि शिक्षण संस्थांना निधीची घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे शिवाजी विद्यापीठ सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठास निधी जाहीर होताच राजर्षी शाहू सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने यापूर्वी शिवाजी विद्यापीठास राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानाच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात भरीव

- कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचे प्रतिपादन
- प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानाअंतर्गत शिवाजी विद्यापीठास २० कोटी रूपयांचा निधी जाहीर

निधी दिला. शैक्षणिक, संशोधकीय पायाभूत सुविधा विकास, नवोपक्रम, नवसंशोधन आणि वेगळे उपक्रमासाठी या निधीचा उपयोग झाला. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत विद्यापीठे सक्षमीकरण योजनेसाठी ५८ विद्यापीठांची निवड करण्यात आली, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्याप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियानाअंतर्गत विद्यापीठांना सक्षम करण्याचे धोरण अवलंबले आहे.

धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, पीएम-उषा समन्वयक डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. सागर डेळेकर, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. आर.बी. पाटील आदी उपस्थित होते.

### आधुनिक शिक्षणासाठी युवा पिढीला प्रेरणा: पंतप्रधान नरेंद्र मोदी

युवा पिढीला आधुनिक शिक्षण घेण्यास प्रेरित करणारा हा नवा भारत आहे. या पिढीसाठीच आयआयटी, आयआयएम, आयआयआयटी, एम्स, एनआयटी अशा आधुनिक शिक्षण संस्थांची उभारणी देशभरात करण्यात येत आहे. या सर्व बाबींचा युवा पिढीने लाभ घ्यावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.यावेळी जम्मूचे उपराज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग, खासदार जुगल किशोर, गुलाब अली आदी उपस्थित होते.

21 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वादविवाद ज्ञानसंवर्धनासाठी चांगले माध्यम

## डॉ. तारा भवाळकर : डॉ. रमेश वरखेडे यांचा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराने गौरव

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : 'वाद व्हायलाच पाहिजेत. वादविवाद हे ज्ञानसंवर्धनाचे खूप चांगले माध्यम आहे. ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये जोपर्यंत वादाला मोकळीक आहे, तोपर्यंत ज्ञान प्रवाही अखंड चालत राहणार आहे,' असे प्रतिपादन लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आज मराठी अधिविभागातर्फे 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार २०२४' प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. भवाळकर प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. डॉ. रमेश वरखेडे यांना डॉ. भवाळकर यांच्या हस्ते 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, 'ज्येष्ठ समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या परंपरेमधून आलेले समीक्षक डॉ. रमेश वरखेडे यांना त्यांच्या गुरूंच्या नावे असलेला हा पुरस्कार मिळणे अत्यंत गौरवास्पद आहे. आमचे शिक्षक आंतरविद्याशाखीय शिक्षण देत होते. या आंतरविद्याशाखेमध्ये सामाजिक विश्लेषण होत असे. त्याकाळी ही मंडळी आम्हाला सनातनी वाटत होती. त्यांची विचार करण्याची आणि अभ्यास करण्याच्या पध्दती वेगळ्या होत्या. पुढे याचा उपयोग भाषिक अभ्यासामध्ये खूप झाला. यांच्या माध्यमातून आम्हाला मोकळा विचार करणारी माणसे भेटली. वितंडवादाने ज्ञान हे वर्धिष्णू होत असते आणि सांस्कृतिकपणातल्या वर्धिष्णुपणाचे हे महत्त्वाचे लक्षण आहे. वादाशिवाय प्रवाह चालत नाही. वाद प्रवाही राहिला नसता तर डॉ. वरखेडेंची निवड झाली नसती. यामध्ये अजूनही सत्य, तथ्य, ज्ञानाला आणि विचारांच्या समीक्षेला महत्व आहे. उपनिषदांमध्ये म्हटले आहे, शिष्य ज्या वेळेस गुरूंचा पराभव करतो त्यावेळेस ज्ञानक्षेत्रात त्याचे एक पाऊल पुढे पडलेले असते, हे या पुरस्कारामधून दिसून आले.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आज मराठी अधिविभागातर्फे डॉ. रमेश वरखेडे यांना डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते 'डॉ. म.सु.पाटील समीक्षा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, कवयित्री निरजा, मंगला वरखेडे आदी उपस्थित होते.

डॉ. वरखेडे म्हणाले, 'स्वतंत्र विचारांची क्षमता निर्माण होणे म्हणजे प्रश्न विचारणे. माझ्या वैचारिक दृष्टीची बैठक डॉ. म. सु. पाटील यांच्या योगदानामुळे घडली. परंतु, त्यांच्या पठडीतील लिखाणाचे अनुकरण मी केलेले नाही. कवी मनाचा अभ्यास या विषयावर डॉ. पाटील खूप वाचन करीत होते. याचा परिणाम पुढे निर्मिती प्रक्रिया आणि कवी मनाचा अभ्यास करण्यासाठी झाला. लिखाणामध्ये ज्ञानशास्त्रीय वजन असले पाहिजे, असे डॉ. म. सु. पाटील नेहमी म्हणत. पुढे तौलनिक साहित्यशास्त्र यावर अभ्यास करून मांडणी केली. अभिरुचीमुळे होणाऱ्या सामाजिक चळवळीचे काही प्रमाणात चटकेही बसले. समाजमन वाचता आले पाहिजे म्हणून सामाजिक भाषा विज्ञान शिकविण्याचा निर्णय घेतला.'

यावेळी लेखिका-कवयित्री निरजा आणि ज्येष्ठ समीक्षक डॉ. अविनाश सप्रे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मानपत्राचे वाचन राजेश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुनीलकुमार लवटे, मंगला वरखेडे, डॉ. राजन गवस, वसंत गायकवाड, कवी खलील मोमीन, आदी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. म. सु. पाटील यांनी डॉ. वरखेडे यांना शिष्य म्हणून स्वीकारण्याआधी सलग दोन निबंध लिहिण्यास सांगितले होते. त्यात डॉ. वरखेडे उत्तीर्ण झाले. आजच्या विद्यार्थ्यांनीही हा प्रयत्न करून पाहिला पाहिजे. त्यात सुरुवातीस आपले लिखाण मार्गदर्शकास दाखवावे.'

21 FEB 2024 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन

# डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराने रमेश वरखेडे सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराने समीक्षक डॉ. रमेश वरखेडे यांना लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते मंगळवारी गौरविण्यात आले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थितीत होते.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, वादविवाद हे ज्ञानसंवर्धनाचे खूप चांगले माध्यम आहे. वाद व्हायलाच पाहिजेत. ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये जोपर्यंत वादाला मोकळीक आहे तोपर्यंत ज्ञान प्रवाही अखंड चालत राहणार आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराने समीक्षक डॉ. रमेश वरखेडे यांना डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते मंगळवारी गौरविण्यात आले. यावेळी रणधीर शिंदे, लेखिका-कवयित्री निरजा, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

करण्यात आले होते. आमचे शिक्षक आंतरविद्याशाखीय शिक्षण देत होते. या आंतरविद्याशाखेमध्ये सामाजिक विश्लेषण होत होते. त्यावेळेस ही मंडळी आम्हाला सनातनी वाटत. त्यांचे विचार करण्याची आणि अभ्यास करण्याच्या पद्धती वेगळ्या होत्या. पुढे याचा उपयोग भाषिक अभ्यासामध्ये खूप झाला. यांच्या माध्यमातून आम्हाला मोकळा विचार करणारी माणसे भेटली.

डॉ. रमेश वरखेडे म्हणाले, स्वतंत्र विचाराची क्षमता निर्माण होणे म्हणजे ज्ञान मिळवणे. माझ्या वैचारिक दृष्टीची बैठक डॉ. म. सु. पाटील यांच्या योगदानामुळे घडली. परंतु, त्यांच्या पद्धतीतील लेखनाचे अनुकरण मी केलेले नाही. यावेळी प्रसिद्ध लेखिका-कवयित्री निरजा आणि ज्येष्ठ समीक्षक डॉ. अविनाश सप्रे यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. [illegible] पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले.

21 FEB 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वादविवाद ज्ञानसंवर्धनाचे चांगले माध्यम

## डॉ. तारा भवाळकर; डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्काराचे वितरण




कोल्हापूर : डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार डॉ. रमेश वरखेडे यांना प्रदान करताना लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी.

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

वादविवाद हे ज्ञानसंवर्धनाचे चांगले माध्यम आहे. वाद व्हायलाच पाहिजेत. ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये जोपर्यंत वादाला मोकळीक आहे, तोपर्यंत ज्ञान प्रवाही, अखंड चालत राहणार आहे, असे प्रतिपादन लोकसाहित्य व लोकसंस्कृतीच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रदान सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, ज्येष्ठ समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या परंपरेमधून आलेले व त्यांची परंपरा मोडून नवीन परंपरा निर्माण करणारे समीक्षक डॉ. वरखेडे यांना त्यांच्या गुरूंच्या नावे असलेला पुरस्कार मिळाला, हे गौरवास्पद आहे.

समीक्षक डॉ. वरखेडे म्हणाले, स्वतंत्र विचारांची क्षमता निर्माण होणे म्हणजे प्रश्न विचारणे. माझ्या वैचारिक दृष्टीची बैठक डॉ. म. सु. पाटील यांच्या योगदानामुळे घडली. त्यांच्या पथडीतील लिखाणाचे अनुकरण मी केले नाही.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अभ्यासक, संशोधक, शिक्षक आणि प्रशासक म्हणून डॉ. वरखेडे यांनी चांगले कार्य केले आहे. गुरू आणि शिष्याचे नाते, व्यावहारिक नाते आणि संशोधनातील नाते यांचा उत्तम पाठ या ठिकाणी दिसून येतो.

लेखिका नीरजा व ज्येष्ठ समीक्षक डॉ. अविनाश सप्रे यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मानपत्राचे वाचन राजेश पाटील यांनी केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुनीलकुमार लवटे, मंगला वरखेडे, डॉ. राजन गवस, वसंत गायकवाड, कवी खलील मोमीन आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2024
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करून अभिवान करण्यात आले.

# शिवाजी विद्यापीठात बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, वृत्तपत्रविद्या व संज्ञापनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.निशा मुडे-पवार, मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा पाटगे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2024
पुण्यनगरी

# 'दर्पण'कार जांभेकर यांना अभिवादन

कोल्हापूर : मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांना जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, वृत्तपत्रविद्या व संज्ञापनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, मास. कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा घाटगे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2024
पुढारी

# विद्यापीठात बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

कोल्हापूर : मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांना जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. शरद बनसोडे, डॉ. निशा मुढे-पवार, डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2024
पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठ प्राणीशास्त्र अधिविभागात आयोजित कार्यशाळेत सहभागी पदवीस्तरीय विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक.

# विद्यापीठातील प्रेरणा, ज्ञान सुदृढीकरण कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागात आयोजित 'इन्स्पिरेशन अँड नॉलेज स्ट्रेन्दनिंग' विषयावरील प्रेरणा व ज्ञान सुदृढीकरण कार्यशाळा झाली. याला विज्ञान महाविद्यालयांतील शिक्षक, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यशाळेचे उद्घाटन प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. नितीन कांबळे होते. डॉ. अण्णा गोफणे यांनी सचिव म्हणून काम पहिले. विभागात सुरू असलेल्या संशोधनाविषयीचे विशेष प्रदर्शन विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. प्रदर्शनात प्रामुख्याने रेशीम उद्योग, कीटकांचे जीवनचक्र व त्यांची विविधता, प्राणी संग्रहालय, शरीरशास्त्रातील विविध उपकरणे, फुलपाखरू उद्यान, प्राणी संगोपन कक्ष, जेल इलेक्ट्रोफोरेसिस, विविध सूक्ष्मदर्शक, स्पेक्ट्रोमीटर, लॅमिनार एअर फ्लो आदी गोष्टी होत्या. विद्यार्थ्यांना विद्यापीठ परिसर, जलसंवर्धनाचे प्रयोग, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, एकात्मिक सुविधा केंद्र याठिकाणीही भेटी घडविण्यात आल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2024
पुढारी



कोल्हापूर : डॉ. व्ही. जी. पारळे आणि डॉ. व्ही. डी. फडतरे यांचा सत्कार करताना प्रा. आर. जी. सोनकवडे.

# एरोजेल संशोधन काळाची गरज

**कोल्हापूर :** एरोजेल पदार्थांचे संशोधन आपले जीवन अधिक सुखकर करेल, असे मत दक्षिण कोरियतील योन्साय विद्यापीठाचे डॉ. व्ही. जी. पारळे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित "एरोजेल मधील नवीन संशोधन" या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी करून दिला. डॉ. पारळे म्हणाले, एरोजेल पदार्थ मुख्यत: अग्निरोधक म्हणून उपयुक्त आहे. त्याचा उपयोग विविध क्षेत्रात केला जाऊ शकतो. भविष्यात एरोजेल पदार्थ हा प्लास्टिक सारखा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग होईल.. डॉ. ए. व्ही. राव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमत: शिवाजी विद्यापीठतील भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये एरोजेल संशोधनाची सुरवात केली आहे. डॉ. के. वाय. राजपुरे यांनी एरोजेल संशोधनात भौतिकशास्त्र अधिविभागाच्या योगादानादाबद्दल माहिती दिली.. भाभा अणुविज्ञान केंद्रासाठी लागणारे एरोजेल पदार्थ भौतिकशास्त्र अधिविभागातील संशोधक डॉ. वाघ, डॉ. हरनाथ यांनी डॉ. राव यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केल्याचे सांगितले. अध्यक्षस्थानावरून डॉ. सोनकवडे म्हणाले, या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. मी विभागप्रमुख झाल्यापासून विद्यार्थी केंद्रीत दृष्टीकोन ठेवून अनेक उपक्रम राबवले. त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. विद्यार्थीनी नेहा व साधना यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. यु. एम. चौगुले, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एस. एस. पाटील, उपस्थित होते.

- **दक्षिण कोरियातील योन्साय विद्यापीठाचे डॉ. व्ही. जी. पारळे यांचे मत**

21 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## समक्ष मुलाखत (Walk in Interview)

### जाहिरात क्र.०२/२०२४

शिवाजी विद्यापीठ कार्यालयात 11 महिन्याच्या हंगामी कालावधीकरिता खालील पदे (रोजंदारी/एकत्रीत मानधनावरील) भरण्यासाठी उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येणार आहे. तेव्हा पात्र उमेदवारांनी मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे अर्ज करून अर्जासह व आपल्या मूळ कागदपत्रांसह व झेरॉक्सप्रतीसह खाली नमूद केलेल्या दिनांकास समक्ष मुलाखतीसाठी स्वःखर्चाने सकाळी 10.00 वाजता उपस्थित रहावे.

## दि.28.02.2024

| अ. क्र | पद | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|
| 1 | कौशल्य विकास अधिकारी पदसंख्या – 01 | Good Academic record with 55% Marks at PG level and minimum 2 (two) years experience skill may be considered. Computer knowledge – MS Office, Power point, social Media users preferred Fluent in English Communication and soft skills **(For more detail refer our 'www.unishivaji.ac.in' wibsite)** | एकत्रित मानधन दरमाह रू.21600/– |
| 2 | अस्थायी कनिष्ठ अभियंता (विद्युत) | B.E. (Electrical) with three years actual experience in HT & LT Installation **or** Diploma in Electrical Engg. from M.S.B.T.E. with 05 years actual construction experience in HT & LT Installation | एकत्रित मानधन दरमाह रू.15000/– |
| 3 | फायर सेफ्टी ऑफीसर पदसंख्या – 01 | Diploma in Fire Safety | एकत्रीत मानधन रू. 15000/– दरमहा |
| 4 | रोजंदारी सुरक्षा रक्षक | Ex-serviceman or persons belonging to Para-military force, Home-guards/SRP **(Ex-serviceman will be preferred)** | प्रतीदिन रू.495/– |
| 5 | रोजंदारी तारतंत्री | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण | प्रतीदिन रू.450/– |
| 6 | रोजंदारी पंप ऑपरेटर | आय.टी.आय पंपचालक प्रमाणपत्रधारक/संबधित क्षेत्रातील 1 वर्षाचा अनुभव | प्रतीदिन रू.450/– |
| 7 | रोजंदारी दुरध्वनी चालक सहायक पदसंख्या – 02 | पदवीधर व दूरध्वनी चालक कोर्स उत्तीर्ण | प्रतीदिन रू.450/– |
| 8 | रोजंदारी ग्रंथालय सहायक | Essential – 1) Any Graduate 2) Pass out M.Lib. & Inf. Sci. Course<br>Desirable – 1) Fair Computer Knowledge (MS-CIT/Certificate/Diploma in Computer) 2) Two years of work experience in academic library | प्रतीदिन रू.400/– |

## दि.29.02.2024

| अ. क्र | पद | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|
| 9 | रोजंदारी हॉर्टिकल्चर सुपरवायझर – पद 01 | बी.एस्सी. (कृषी/हॉर्टी) पदवीधर, किमान 02 वर्षे कोणत्याही शासकीय क्षेत्रात/स्थानिक स्वराज्य संस्था/सहकारी संस्था/स्वायत्त मंडळ/खाजगी क्षेत्रात या कामाचा अनुभव | प्रतीदिन रू.750/– |
| 10 | रोजंदारी कनिष्ठ लेखनिक | पदवीधर व संगणकाचे ज्ञान आवश्यक **(शासनमान्य इंग्रजी व मराठी टंकलेखनाचे ज्ञान आवश्यक)** | प्रतीदिन रू.400/– |
| 11 | रोजंदारी महिला नाईट वॉर्डन | किमान 12 वी उत्तीर्ण, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी असल्यास प्राधान्य तसेच चांगल्या वर्तणुकीचा दाखला आवश्यक | प्रतीदिन रू.400/– |
| 12 | रोजंदारी पुरूष नाईट वॉर्डन | किमान 12 वी उत्तीर्ण, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी असल्यास प्राधान्य तसेच चांगल्या वर्तणुकीचा दाखला आवश्यक | प्रतीदिन रू.400/– |
| 13 | रोजंदारी वाहनचालक | किमान 8 वी उत्तीर्ण, जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना व अनुभव आवश्यक | प्रतीदिन रू.450/– |
| 14 | रोजंदारी ट्रॅक्टर चालक | किमान 8 वी उत्तीर्ण ट्रॅक्टर व ट्रॉली चालविण्याचा परवाना आवश्यक | प्रतीदिन रू.450/– |

## दि.01.03.2024

| अ. क्र | पद | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|
| 15 | अस्थायी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | B.E. (Civil) with three years actual construction experience **or** Diploma in Civil Engg. from M.S.B.T.E. with 05 years actual construction experience | एकत्रित मानधन दरमहा रू.15000/– |
| 16 | रोजंदारी प्रयोगशाळा सहायक | • Any Diploma from M.S.B.T.E. or B.Sc.<br>• संगणक ज्ञान आवश्यक | प्रतीदिन रू.400/– |
| 17 | रोजंदारी कुली | 7 वी पास, स्वच्छक कामाचा अनुभव अथवा तयारी असल्यास प्राधान्य | प्रतीदिन रू.400/– |
| 18 | रोजंदारी शिपाई | 7 वी पास | प्रतीदिन रू.350/– |
| 19 | रोजंदारी सुतार | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण किंवा सुतार कामाचा 1 वर्षे अनुभव | प्रतीदिन रू.450/– |
| 20 | रोजंदारी नळ कारागीर | आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण किंवा नळ कारागीर कामाचा 1 वर्षे अनुभव | प्रतीदिन रू.450/– |
| 21 | रोजंदारी गवंडी | आय.टी.आय बिल्डींग कन्स्ट्रक्शन कोर्स उत्तीर्ण किंवा गवंडी कामाचा 1 वर्षे अनुभव | प्रतीदिन रू.450/– |
| 22 | रोजंदारी अस्थायी आया/शिपाई (पाळणाघरसाठी) | आरोग्य सहाय्यक कोर्स पूर्ण करणाऱ्यांना अथवा मान्यताप्राप्त रूग्णालयातील आया/शिपाई अथवा तत्सम पदाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य | प्रतीदिन रू.350/– |

1. **वयोमर्यादा :– उपरोक्त अ.क.4 सुरक्षा रक्षक** पदासाठी उमेदवाराची किमान वयोमर्यादा 25 वर्षे व कमाल 58 वर्षे राहील. **अ.क.11 व 12 नाईट वॉर्डन पदाकरीता** किमान वयोमर्यादा 40 वर्षे व कमाल वयोमर्यादा 65 वर्षे राहील. **उर्वरीत सर्व** पदाकरिता खुल्या वर्गातील उमेदवारासाठी किमान 18 वर्षे व कमाल 38 वर्षे वयोमर्यादा राहील व राखीव उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 43 वर्षे राहील. सदर किमान व कमाल वयोमर्यादा मुलाखती दिवशी सापेक्ष समजण्यात येईल.
2. उपरोक्त सर्व पदे ११ महिन्याकरिता हंगामी पध्दतीने तात्पुरत्या कालावधीकरिता भरावयाची असल्यामुळे, या पदासाठी कायमस्वरूपी पदाप्रमाणे कोणतेही फायदे मिळणार नाहीत. तसेच सदर पदावर काम केल्यामुळे विद्यापीठाच्या नियमित सेवेतील कोणत्याही पदावर हक्क संबंध अथवा अधिकार राहणार नाही.
3. उपरोक्त समक्ष मुलाखतीअंती निवड झालेल्या उमेदवारांना संबंधीत पदावरील सध्या विद्यापीठाकडील उपलब्ध प्रतिक्षा यादी संपलेनंतरच आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देण्यात देतील. याची नोंद घ्यावी.
4. सदर पदासाठीचे अर्ज मुलाखती दिवशी सकाळी 11.00 वाजेपर्यंतच स्वीकारले जातील. त्यानंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

मुलाखतीचे ठिकाण:– मुख्य प्रशासकीय इमारत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

शिवाजीवि/आस्थापना
दिनांक:– 21.02.2024

21 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची विजयी सलामी

## खेलो इंडिया आंतरविद्यापीठ फुटबॉल : आदित्य कल्लोळीची हॅट्ट्रिक


■ सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. २० : चुरशीच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने कोलकात्याच्या एडीएएमएस विद्यापीठाला ३-२ असे नमवून खेलो इंडिया आंतर विद्यापीठ राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत विजयी सलामी दिली. शिवाजी विद्यापीठाचा आघाडीपटू आदित्य कल्लोळी याने हॅटट्रिक करून दिवस गाजविला. सांघिक बहारदार खेळाच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाने विजय खेचून आणला. ऐझवाल (अरुणाचल प्रदेश) येथे ही स्पर्धा सुरू आहे.

सामन्याच्या पूर्वार्धात प्रथमेश हेरेकरच्या पासवर आदित्यने पहिला गोल करून कोलकात्याला धक्का दिला.



आदित्य कल्लोळी



त्यामुळे विश्वास दुणावलेल्या शिवाजी विद्यापीठाने अधिक अचूक खेळ करून कोलकात्याच्या गोलक्षेत्रात चेंडू ठेवला. २२ व्या मिनिटाला प्रभू पोवारच्या पासवर आदित्यने आपला आणि संघाचा दुसरा गोल करून आघाडी २-० अशी भक्कम केली. लागोपाठ दोन गोल झाल्याने हडबडलेल्या कोलकाता संघाला ३७ व्या मिनिटाला सागर पोवारच्या पासवर आदित्यने तिसरा गोल करून हॅटट्रिक साजरी केली.

मध्यंतरानंतर व्यूहरचना बदलून कोलकाता संघाने ४९ व्या मिनिटाला मैदानी गोल करून सामन्यात ३-१ असा गोलफरक केला. त्यानंतर चेंडूवर नियंत्रण ठेवत शिवाजी विद्यापीठाला रोखण्यात यश मिळविले. वाढलेल्या चढायांमुळे शिवाजी विद्यापीठाच्या बचावपटूंनी कोलकाता संघाच्या आघाडीपटूला अवैधरीत्या रोखल्याबद्दल मिळालेल्या पेनल्टीवर कोलकाता संघाने गोल करून सामना ३-२ असा रंगतदार केला. पण, शिवाजी विद्यापीठाच्या ओमकार लायकर, साहिल खोत, शाहिद महालकरी, ऋतुराज सूर्यवंशी आणि गोलरक्षक अनिल जानकर यांनी चिवटपणे हल्ले परतवून कोलकाता संघा मनसुबे उधळवून लावले. अखेर याच गोलफरकावर शिवाजी विद्यापीठाने पहिल्या सामन्यात महत्त्वपूर्ण तीन गुण मिळविले. सांघिक खेळाच्या जोरावर खेळाडूंनी यश मिळविल्याचे प्रशिक्षक अमर सासने यांनी सांगितले.



### गुरुवारचा सामना

■ कोट्टायम् (केरळ) महात्मा गांधी विद्यापीठ वि. शिवाजी विद्यापीठ दु. २ वा.